**प्रेसनोट** दिनांक ०७/०३/२०२६

सायबर गुन्हेगार पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून समाजातील जेष्ठ नागरिकांना मनीलॉन्ड्रींग सारख्या गुन्हयात अटकेची भीती घालून **''डिजिटल अरेस्ट''** या सायबर गुन्हयाव्दारे लाखो करोडोंची लुबाडणूक करत असून अशा सायबर गुन्हयांपासून जेष्ठ नागरिकांना वाचविण्यासाठी सायबर गुन्हे शाखा, मुंबई पोलीसांनी जनजागृती मोहिमे अंतर्गत परिमंडळ ११ हद्दीतील एकूण ५६३ जेष्ठ नागरिकांमध्ये जनजागृती केले बाबत...

-----------

सद्यस्थितीत सायबर गुन्हेगार हे समाजातील सर्वसामान्य नागरिकांची वेगवेगळया प्रकारे ऑनलाईन फसवणूकी करत असून ''डिजिटल अरेस्ट'' या प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमध्ये सायबर गुन्हेगारांनी पोलीस गणेवष परिधान करून, पोलीस अधिकारी तसेच इतर तपास यंत्रणा आणि न्यायालये यांची नावे वापर करून, पोलीस असल्याचा बनाव तयार करुन विशेषत: जेष्ठ नागरिकांना मोबाईल फोन व्दारे , व्हिडीओ कॉल व्दारे संपर्क करून मनीलॉन्ड्रींग, ड्रग्स तस्करी, अवैध्य धंदे यामध्ये त्यांचा सहभाग असल्याचे सांगून, त्यामध्ये अटकेची भीती घालून तसेच व्हिडीओ कॉल व्दारे दिवसरात्र सर्व्हेलन्सवर ठेवून आर्थिक लुबाडणूक करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने समाजातील विशेषत: एकटे राहणारे जेष्ठ नागरिकांमध्ये अशाप्रकारच्या वाढत्या सायबर फसवणूकीबाबत जनजागृती करण्यासाठी सायबर विभाग, गुन्हे शाखा, मुंबई पोलीस यांच्या वतीने परिमंडळ ११ हद्दीतील एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिकांमध्ये **''डिजिटल अरेस्ट''** सायबर फसवणुकीबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत परिमंडळ ११ हद्दीमधील एकटे राहणारे एकूण ५६३ ज्येष्ठ नागरिक यांची माहीती प्राप्त करुन ५ प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई मधील एकुण ०८ पोलीस अधिकारी व ३६ अंमलदार यांनी वैयक्तिक रित्या ज्येष्ठ नागरिकांचे रहाते पत्त्यावर भेट देवुन **''डिजिटल अरेस्ट''** या सायबर फसवणुकीबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच माहिती अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी मराठी व इंग्रजी भाषेत माहितीपत्रक (पॅम्पलेट) वाटप करण्यात आले.

या उपक्रमा दरम्यान ज्येष्ठ नागरिकांनी मुंबई पोलीसांचे कौतुक केले आणि ''डिजिटल अरेस्ट'' या सायबर फसवणुकीबाबत सतर्क राहणार असल्याबाबत सांगितले.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे श्री. पुरुषोत्तम कराड, मा.सहा.पोलीस आयुक्त(सायबर विभाग), श्री. इरफान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे शाखेतील सर्व वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली आहे.

नागरिकांना आवाहन :- डिजीटल अरेस्ट या सायबर फसणुकीपासुन सुरक्षित राहण्याकरिता खालील सुचनांचे पालन करावे.

१. पोलीस /CBI/ED/RBI किंवा कोणतीही शासकीय संस्था डिजिटल अटक करत नाही.
२. कायद्यात डिजिटल अटक अशी कोणतीही तरतूद नाही.
३. अनोळखी व्यक्तींचे व्हिडिओ कॉल स्वीकारू नका.
४. अशा कॉल नुसार कधीही पैसे पाठवू नका.
५. कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या वागण्यात किंवा मूडमध्ये बदल दिसल्यास त्याकडे लक्ष द्या.
६. जर तुम्ही डिजिटल अरेस्टचे बळी ठरला असाल, तर आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि नातेवाईकांना त्वरित माहिती द्या.
७. जर तुम्हाला डिजिटल अटकेबद्दल कोणताही कॉल आला, तर लगेच जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा किंवा मदतीसाठी १००/१९३० या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा किंवा www-cybercrime-gov.in यावर तक्रार नोंदवा.

-------------

# डिजिटल अटक
## घोटाळ्यापासून कसे सुरक्षित राहावे

1930
NEW CYBER CRIME HELPLINE NUMBER

1. पोलीस/CBI/ED/RBI किंवा कोणतीही शासकीय संस्था डिजिटल अटक करत नाही.
2. कायद्यात डिजिटल अटक अशी कोणतीही तरतूद नाही.
3. अनोळखी व्यक्तींचे व्हिडिओ कॉल स्वीकारु नका.
4. अशा कॉल नुसार कधीही पैसे पाठवू नका.
5. कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या वागण्यात किंवा मूडमध्ये बदल दिसल्यास त्याकडे लक्ष द्या.
6. जर तुम्ही डिजिटल अरेस्टचे बळी ठरला असाल, तर आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि नातेवाईकांना त्वरीत माहिती द्या.
7. जर तुम्हाला डिजिटल अटकेबद्दल कोणताही कॉल आला, तर लगेच जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा किंवा मदतीसाठी **100/1930** या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा किंवा www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.

**सायबर क्राईम शाखा, मुंबई पोलीस - तुमच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर**

# Prevention from DIGITAL ARREST SCAM

1930
NEW CYBER CRIME HELPLINE NUMBER

1. No Police/CBI/ED/RBI or any other government agency ask for Digital arrest.
2. There is no provision of Digital arrest in Law.
3. Never Accept Video calls from unknown person.
4. Don't make payment as per sunch calls.
5. Observe if there has been a change in mood or behavior of your any family member.
6. Inform you family members and relatvies if you are victim of digital arrest.
7. If you receive any call about digital arrest, visit the nearest Police Station or call on 100/1930 helpline numbers and register complaint on www.cybercrime.gov.in

**CYBER CRIME BRANCH, MUMBAI POLICE, ALWAYS FOR YOUR DIGITAL SAFETY**






OPPO F21 Pro



